# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्रमांक १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
दूरध्वनी क्रमांक : ०२२ ६६४०५०६६ संकेतस्थळ : https://mhada.gov.in


जा.क्र.जसंवि/प्रसिद्धी पत्रक/ १९९ दि. २१/०१/२०२१

प्रसिद्धी पत्रक

# म्हाडा पुणे मंडळातर्फे ५ हजार ६४७ सदनिकांसाठी उद्या संगणकीय सोडत

९२ हजार ३३५ अर्जदार पात्र ; वेबकास्टिंगच्या माध्यमातून अर्जदारांना घरबसल्या सोडत बघण्याची सुविधा उपलब्ध

मुंबई, दि. २१ जानेवारी, २०२१ : पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडाचा घटक) पुणे, कोल्हापूर, सांगली व सोलापूर जिल्ह्यातील विविध गृहनिर्माण योजनेतील ५ हजार ६४७ सदनिका व राधानगरी (कोल्हापूर) येथील ६८ भूखंड विक्रीसाठी शुक्रवार, दि. २२ जानेवारी, २०२१ रोजी सकाळी दहा वाजता पुणे कॅन्टोन्मेंट येथील नेहरू मेमोरियल हॉल येथे संगणकीय सोडत काढण्यात येणार आहे. ५ हजार ६४७ सदनिकांच्या सोडतीसाठी ९२ हजार ३३५ अर्जदार पात्र ठरले आहेत.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. अजित पवार यांच्या हस्ते सोडतीचा शुभारंभ केला जाणार आहे. गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे, गृहनिर्माण राज्यमंत्री श्री. सतेज पाटील, सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. दत्तात्रय भरणे, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सभापती श्री. विनोद घोसाळकर, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव श्री. एस. व्ही. आर. श्रीनिवास, म्हाडाचे उपाध्यक्ष श्री. अनिल डिग्गीकर आदी या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

'वेबकास्टिंग' तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सोडतीच्या कार्यक्रमाचे घरबसल्या थेट प्रक्षेपण (Live telecast) बघण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सोडतीचे थेट प्रक्षेपण बघण्यासाठी अर्जदारांनी http://bit.ly/PuneLottery2021 या लिंकवर क्लिक करावे, असे आवाहन पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. नितीन माने यांनी केले आहे. सोडतीचा निकाल सायंकाळी ६ वाजता https://lottery.mhada.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध केला जाईल.

सोडतीत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत म्हाळूंगे (चाकण), जि. पुणे - ५१४ सदनिका, तळेगांव दाभाडे (जि. पुणे) - २९६ सदनिका, करमाळा (जि. सोलापूर) - ७७ सदनिका, सांगली - ७४ सदनिकांचा समावेश आहे.

म्हाडा गृहनिर्माण योजनेअंतर्गत मोरवाडी पिंपरी (पुणे) - ८७ सदनिका, पिंपरी वाघेरे (पुणे) - ९९२ सदनिका, सांगली येथे १२९ सदनिका आहेत.

प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य योजनेअंतर्गत म्हाळुंगे (जि. पुणे) येथे १८८० सदनिका, दिवे (जि. पुणे) १४ सदनिका, सासवड (जि. पुणे) ४ सदनिका, सोलापूर येथील ८२ सदनिकांचा समावेश आहे.

२० टक्के सर्व समावेशक गृहनिर्माण योजनेअंतर्गत पुणे महानगरपालिका हद्दीत ४१० सदनिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत १०२० सदनिका व कोल्हापूर महानगरपालिका हद्दीत ६८ सदनिकांचा सोडतीत समावेश आहे. या सर्व सदनिका अत्यल्प, अल्प, मध्यम आणि उच्च उत्पन्न गटांसाठी उपलब्ध आहेत. तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी येथील ६८ भूखंड देखील या सोडतीत विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

सोडतीचा कार्यक्रम कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने आखून दिलेल्या नियमावलीनुसार होणार आहे.

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा